# भाषाविज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ व उन्नती संस्था

## आयोजित



# "शाळेमधील भाषा"

## एक अल्प मुदतीचा अभ्यासक्रम

(शिक्षक, शिक्षकांचे शिक्षक, स्वयंसेवी संस्थांची मंडळी, 'भाषा' समजून घेण्यात रस असलेले.. यांच्यासाठी.)

### या अभ्यासक्रमातून काय शिकायला मिळेल?

- भाषा आणि भाषिक वापर- वैज्ञानिक व सखोल आकलन
- वर्गातील भाषिक वैविध्य समजून घेण्यासाठी व हाताळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे
- भाषा आणि विचार यांतील सहसंबंध
- Language-across-curriculum या संकल्पनेच्या गरजांबद्दलची समज
- शैक्षणिक व्यवहाराची भाषा आणि विद्यार्थ्यांच्या भाषिक गरजा यांचा मेळ घालण्यासाठी सहाय्यक अशी मार्गदर्शक तत्त्वे

" शिक्षणातील भाषेचे समाजभाषाविज्ञान आणि त्याचे भाषिक परिस्थितीशी नाते" याबाबत सखोल समज तयार होईल.

### अभ्यासक्रमात हाताळल्या जाणा-या काही महत्त्वाच्या संकल्पना:

१) वैश्विक व्याकरण (Universal Grammar) आणि भाषिक विविधता

२) भाषेच्या संरचनेचे ज्ञान व भाषिक वापराचे ज्ञान (Linguistic Competence and Communicative Competence)

३) भाषक आणि भाषेची कार्ये या दोहोंमुळे घडणारे भाषिक वैविध्य : बोली, शैली, आणि कार्यसापेक्ष भाषिक प्रकार (Language, Dialect, Register)

४) भाषिक विविधता आणि त्याचा सामाजिक घटकांशी (जात, वर्ग, लिंगभेद इ.) असणारा संबंध: भाषा आणि सत्ता

५) भाषाद्वित्वाची संकल्पना व तिचे महत्त्व (Diglossia)

६) भाषाद्वित्व आणि 'शिक्षणातील भाषा'

७) बहुभाषिक शिक्षण म्हणजे नेमके काय?

८) बहुभाषिक शिक्षण-पद्धतीपुढील आव्हाने: भाषिक अर्थकारण, भाषा व वंश, भाषिक असमानता

९) भाषा कशी शिकवावी?

अशा भाषेच्या विविधअंगांनी मार्गदर्शन!!

**अभ्यासक्रम शुल्क: रु. १९००/- (प्रति व्यक्ती)**

(मध्यान्ह भोजन, चहा / कॉफी, वाचन साहित्य, तज्ज्ञता शुल्क यांचा अंतर्भाव)

| स्थळ | दिनांक | वेळ | नोंदणी करिता अंतिम दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| भाषाविज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ (कलिना परिसर), सांताक्रूज-पूर्व | ३१ मे ते ४ जून २०१९ (५ दिवस) | सकाळी १० ते सायंकाळी ६ | २५ एप्रिल २०१९ (मर्यादित सदस्य संख्या) |

विद्यापीठात बाहेरून येणा-यांसाठी निवास सुविधा (DORMITORY) प्रत्येक रात्रीस १०० रुपये याप्रमाणे वेगळे देऊन उपलब्ध असेल.

नोंदणी करिता गुगल फॉर्म दुवा - https://goo.gl/aDhtvA

अधिक माहितीसाठी संपर्क

- bhasha.abhyas@gmail.com

- ९८९२१ ०३३७१ उन्नती संस्था



**भाषाविज्ञान विभाग मुंबई विद्यापीठ व उन्नती संस्था**

आयोजित

# "शाळेमधील भाषा"

**एक अल्प मुदतीचा अभ्यासक्रम**

(शिक्षक, शिक्षकांचे शिक्षक, स्वयंसेवी संस्थांची मंडळी, 'भाषा' समजून घेण्यात रस असलेले यांच्यासाठी)

**"शिक्षणातील भाषेचे समाजभाषाविज्ञान आणि त्याचे भाषिक परिस्थितीशी नाते"**

शालेय व्यवहारामध्ये कोणत्याही विषयाच्या आकलनाचे महत्त्वाचे साधन भाषा असल्यामुळे दर्जेदार शिक्षण आणि शाळेच्या परिघातील भाषिक व्यवहार यांचे घनिष्ठ नाते असते. मात्र, वर्गातील मुलांच्या मातृभाषा, शिक्षकाची भाषा, पाठ्यपुस्तकाची भाषा, तसेच वेगवेगळया विषयांची स्वतंत्र भाषा (गणिताची भाषा, भूगोलाची भाषा इ.), अशा गुंतागुंतीच्या भाषिक परिस्थितीला वर्गातील शिक्षकालाच सामोरे जावे लागते. त्यासाठी, आणि आपल्या विद्यार्थ्यांच्या भाषिक अडचणी, गरजा समजून घेऊन त्यांना शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शिक्षकाला भाषा, भाषेचा वापर तसेच भाषा व समाजाचा संबंध यांविषयीची सखोल जाणीव असणे आवश्यक आहे. म्हणूनच, शिक्षकांसाठी "शिक्षणातील भाषेचे समाजभाषाविज्ञान आणि त्याचे भाषिक परिस्थितीशी नाते" हा एक विशेष अभ्यासक्रम सादर करत आहोत.

सदर अभ्यासक्रमामध्ये समाजातील भाषिक वापराशी निगडित विविध पैलूंचा परामर्श घेण्यात येईल. यामध्ये आपल्या सामाजिक परिसरात, विशेषतः शैक्षणिक संस्थांच्या परिघात, कोणत्या भाषा / भाषिक प्रकार कधी व कशासाठी वापरले जातात; त्या भाषांची निवड आपण कशी करतो, यासारख्या प्रश्नांचा शास्त्रोक्त पद्धतीने ऊहापोह करण्यात येणार आहे. असे भाषिक निर्णय आपण सतत आणि नकळत घेतच असतो, पण त्या निर्णयामागे काही तत्त्वे दडलेली आहेत का, त्यामागच्या आपल्या भाषिक-सामाजिक गरजा काय असतात; तसेच शाळांच्या स्वतःच्या अशा खास गरजा कोणत्या, व त्यामुळे शाळांमधील भाषिक व्यवहार कसा घडत असतो; त्याचा आपल्या एकंदरीत सामाजिक भाषिक वर्तनाशी काय संबंध असतो; भाषा आणि विचार या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत का की त्या परस्परांशी निगडीत आहेत, त्याचा शिक्षणाशी काय संबंध आहे; अशा काही प्रश्नांची चर्चा या अभ्यासक्रमामध्ये होईल. त्यायोगे, दर्जेदार शिक्षण, भाषा आणि सामाजिक न्याय यांच्यामधील परस्परसंबंध जाणून घेणे हा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे.

**अभ्यासक्रमात हाताळल्या जाणाऱ्या काही महत्त्वाच्या संकल्पना:**

१) वैश्विक व्याकरण (Universal Grammar) आणि भाषिक विविधता

२) भाषेच्या संरचनेचे ज्ञान व भाषिक वापराचे ज्ञान (Linguistic Competence and Communicative Competence)

३) भाषक आणि भाषेची कार्ये या दोहोंमुळे घडणारे भाषिक वैविध्य : 'बोली', शैली, आणि कार्यसापेक्ष भाषिक प्रकार (Language, Dialect, Register)

४) भाषिक विविधता आणि त्याचा सामाजिक घटकांशी (जात, वर्ग, लिंगभेद इ. ) असणारा संबंध: भाषा आणि सत्ता

५) भाषा विकास आणि 'विकसित भाषा' (Language-by-development)

६) भाषा आणि बोली यांचा संबंध

७) एकास एक उद्देशून वापरण्याची भाषा (उदा. समोरासमोरील संवाद) एकाने अनेकांना उद्देशून वापरण्याची भाषा (भाषण, कीर्तन इ. मध्ये) यांमधील फरक

८) भाषाद्वित्वाची संकल्पना व तिचे महत्त्व (Diglossia)

९) भाषाद्वित्व आणि 'शिक्षणातील भाषा'

१०) बहुभाषिक शिक्षण म्हणजे नेमके काय?

११) बहुभाषिक शिक्षणा पद्धतीपुढील आव्हाने: भाषिक अर्थकारण, भाषा व वंश, भाषिक असमानता

१२) भाषा कशी शिकवावी ?

**अभ्यासक्रमातून काय मिळेल?**

- भाषा आणि भाषिक वापर यांचे वैज्ञानिक व सखोल आकलन
- वर्गातील भाषिक वैविध्य समजून घेण्यासाठी व हाताळण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे
- भाषा आणि विचार यांतील सहसंबंध
- Language-across-curriculum या संकल्पनेच्या गरजांबद्दलची समज
- शैक्षणिक व्यवहाराची भाषा आणि विद्यार्थ्यांच्या भाषिक गरजा यांचा मेळ घालण्यासाठी सहाय्यक अशी मार्गदर्शक तत्त्वे

**अभ्यासक्रम शुल्क:** रु. १९०० /- माणशी (मध्यान्ह भोजन, चहा / कॉफी, वाचन साहित्य, तज्ज्ञता शुल्क यांचा अंतर्भाव)

**स्थळ:** भाषाविज्ञान विभाग, मुंबई विद्यापीठ (कालिना परिसर), सांताक्रूज, मुंबई

**दिनांक:** ३१ मे ते ४ जून २०१९ ( ५ दिवस )

**वेळ:** सकाळी १० ते सायंकाळी ६

**बाहेरून येणाऱ्यांसाठी निवास सुविधा विद्यापीठात उपलब्ध (DORMITORY); प्रत्येक रात्रीस १०० रुपये याप्रमाणे वेगळे देऊन.**

**मर्यादित सहभागी संख्या नोंदणी लवकरात लवकर करावी .**

**नोंदणी करिता गुगल फॉर्म दुवा :**

**https://goo.gl/7RrmCJ**

वरील गुगलफॉर्ममध्ये माहिती भरल्यावर आपणांस शुल्क जमा करण्यासंबंधी माहिती पाठवली जाईल.

संपर्क – bhasha.abhyas@gmail.com